# मिठी नदीच्या रुंदीकरणात राजकीय अडथळे

सर्व राजकीय पक्ष व राजकीय नेत्यांनी आपापले व्होट बँकेचे राजकारण बाजूला ठेवून मिठी नदीचे रुंदीकरण व पुनरुज्जीवनाच्या कामात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन भाजपा नेते डॉ. किरीट सोमय्या व श्री. गोपाळ शेट्टी यांनी केले आहे. या कामी सातत्याने पाठपुरावा करूनही विमानतळ ते सीएसटी रोड, सीएसटी ते वांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, कपाडिया नगर, परीघ खाडी आदी टप्प्यांमध्ये मिठी नदीचे फूटभरही रुंदीकरण होऊ शकले नाही, ही दुर्दैवाची बाब असल्याचे मत या दोन नेत्यांनी व्यक्त केले आहे.

मिठी नदीच्या सभोवताली असलेल्या एकाही भंगारवाल्याला हात लावायचा नाही, अशी बहुधा प्रतिज्ञाच सत्तारूढ आघाडीतील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या स्थानिक आमदारांनी केली आहे. आपापली मतपेढी सांभाळण्यासाठी हे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत.

२००५–०६ मध्ये मिठी नदीच्या रुंदीकरणाचा पहिला टप्पा पार पाडण्यात आला. परंतु त्यानंतर मात्र नदी पात्रातील अनधिकृत बांधकामांना संरक्षण देण्यासाठी सातत्याने राजकीय दडपण आणले जात आहे.

उपरोल्लेखित ठिकाणी यंदा पाणी साठेल अशी भीती डॉ. किरीट सोमय्या व श्री. गोपाळ शेट्टी यांनी व्यक्त केली आहे. महापालिकेने मिठी नदीच्या उगमापासून म्हणजेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यान / विहार तलाव येथपासून ते विमानतळापर्यंत रुंदीकरणाचे काम पूर्ण केले आहे. विमानतळाच्या उत्तरेकडे म्हणजेच क्रांतीनगर येथे ३०० फुटांपर्यंतचे रुंदीकरण झाले आहे. एम.एम.आर.डी.ए.ने सुद्धा वांद्रे–कुर्ला कॉम्प्लेक्सपर्यंत ३०० ते ८०० फुटांपर्यंत रुंदीकरण केले आहे. परंतु विमानतळाची दक्षिण बाजू ते सीएसटी रोड आणि वांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स यामधील सुमारे दीड किलोमीटरचा परिसर हा अजूनही १५० ते १८० फूट एवढाच रुंद राहिलेला आहे.

येऊ घातलेल्या विधानसभा व लोकसभा निवडणुका डोळ्यांपुढे ठेवून काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस सरकार या परिसरातील नागरिकांवर पुन्हा एकदा २६ जुलै २००५ चा अनुभव घेण्याची पाळी आणत आहे. थोडा सुद्धा पाऊस झाला तरी या भागात हाहाकार उडू शकतो. २६ जुलै २००५ रोजी मिठी नदीच्या पात्रात ५४० लोक मरण पावले होते. तरीसुद्धा भंगारवाले व अन्य एक दोन बांधकामांना संरक्षण देण्यासाठी सरकार मुंबईकरांच्या जिवाशी खेळत आहे.

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी राजकीय हितसंबंधीयांच्या दडपणाखाली येऊ नये, असे आवाहन भाजपा करीत आहे. एम.एम. आर. डी. ए., मुंबई महापालिका यांचे आयुक्त तसेच राज्याच्या मुख्य सचिवांनी कोणत्याही दडपणाखाली झुकून न जाता माधवराव चितळे व अन्य तज्ज्ञांच्या समित्यांनी केलेल्या शिफारशीनुसार मिठी नदीचे पात्र ३०० फूट वा अधिक रूंद करावे.

जोराचा पाऊस झाल्यास एअरलाईन्स कॉलनी, कल्पना टॉकिज जंक्शन, लालबहादूर शास्त्री मार्ग तसेच कुर्ला स्थानकानजीक रेल्वेरुळांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचेल, अशी भीती भाजपा नेत्यांनी व्यक्त केली आहे.

या कामासाठी केंद्रातील काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने १२६० कोटी रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा केली होती. परंतु आजपावेतो त्यातील एक रुपयाही दिलेला नाही. हाच प्रकार राज्य सरकारने सुद्धा केलेला आहे. मिठी नदीच्या रुंदीकरणाचे काम महापालिका व एम.एम.आर.डी.ए. यांच्याच निधीतून राबविला जात आहे.

**प्रसिद्धी सचिव**